**L. A. BILL No. XXX OF 2026.**

A BILL

TO AMEND THE BHARATIYA NYAYA SANHITA, 2023, IN ITS APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA.

**सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३०.**

**भारतीय न्याय संहिता, २०२३, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यात सुधारणा करण्याकरिता विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक २५ मार्च, २०२६ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**(विधानपरिषदेने दिनांक २५ मार्च, २०२६ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

२०२३ चा ४५. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, भारतीय न्याय संहिता, २०२३, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यात सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सत्त्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :-

**१.** या अधिनियमास, भारतीय न्याय संहिता (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, २०२६, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

सन २०२३ चा अधिनियम क्रमांक ४५ याच्या कलम ७२ ची सुधारणा.

**२.** भारतीय न्याय संहिता, २०२३ (यात यापुढे, जिचा निर्देश, "उक्त संहिता" असा केला आहे), महाराष्ट्र राज्यास लागू असताना, तिच्या कलम ७२ मध्ये, पोट-कलम (१) मधील, "कलम ७१" या मजकुरानंतर, "किंवा कलम १२४" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल. २०२३ चा ४५.

सन २०२३ चा अधिनियम क्रमांक ४५ याच्या कलम ७५ ची सुधारणा.

**३.** उक्त संहितेच्या कलम ७५ मध्ये,-

(१) पोट-कलम (१) मधील,-

(एक) खंड (चार) मधील, "शेरेबाजी करणे." या मजकुरानंतर, ";किंवा" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल;

(दोन) खंड (चार) नंतर, पुढील खंड जादा दाखल करण्यात येतील:-

"(पाच) जे कामुक किंवा अश्लील स्वरूपाचे असेल अशा रीतीने, दूरध्वनीद्वारे, ई-मेलद्वारे, समाजमाध्यम व्यासपीठाद्वारे किंवा संदेशवहनाच्या अन्य कोणत्याही वीजकीय (इलेक्ट्रॉनिक) किंवा डिजिटल मार्गाने क्षोभकारी संभाषण करणे ; किंवा

(सहा) महिलेच्या संमतीने किंवा संमतीविना कोणत्याही लैंगिक कृतीतील तिच्या सहभागासह, त्या महिलेच्या शरीराच्या कोणत्याही भागाची, वीजकीय (इलेक्ट्रॉनिक) किंवा इतर कोणत्याही स्वरूपाच्या माध्यमामार्फत वास्तविक किंवा बनावट वर्णनाचा समावेश असलेली कोणतीही छायाचित्रे, ध्वनीफित किंवा चलचित्रफित टाकण्याची (अपलोड) किंवा प्रसारित करण्याची धमकी देणे ; किंवा

(सात) महिलेची बदनामी करण्यासाठी किंवा तिचा दुर्लौकिक करण्यासाठी कोणत्याही स्वरूपातील सामाजिक वीजकीय (इलेक्ट्रॉनिक) माध्यमाचा किंवा इतर कोणत्याही माध्यमाचा वापर करणे ; किंवा

(आठ) महिलेचा प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे विनयभंग होईल किंवा तिच्या खाजगीपणाचे उल्लंघन होईल अशाप्रकारे तिच्या नावाचा, तपशिलांचा, छायाचित्रांचा किंवा इतर कोणत्याही ओळख साधनांचा वापर करणे.";

(२) पोट-कलम (२) मधील, "खंड (तीन)" या मजकुरानंतर, " किंवा खंड (पाच) किंवा खंड (सहा) किंवा खंड (सात) किंवा खंड (आठ)" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३०. ]**

**[ भारतीय न्याय संहिता, २०२३, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यात सुधारणा करण्याकरिता विधेयक.]**

**[श्री. देवेंद्र फडणवीस,**
मुख्यमंत्री.]

**[ विधानसभेने दिनांक २५ मार्च, २०२६ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**[ विधानपरिषदेने दिनांक २५ मार्च, २०२६ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**डॉ. विलास आठवले,**
सचिव-३,
महाराष्ट्र विधानपरिषद.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.